**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ११/१०/२०११

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ७ शनिवार दि.१५/१०/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये — अहमदनगर महानगरपालिका.

**शनिवार दिनांक- १५/१०/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ४७ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५ शुक्रवार दिनांक २३/९/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक ६ शुक्रवार दिनांक ३०/९/२०११रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ४८ | श्री. शेख आसीफ इस्माईल, रा. अभिलाषा कॉलनी मुकुंदनगर वॉर्ड क्र.८८ यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकून आकारलेली सन २००५ ते २०१२ अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/- बील क्रमांक ३७३ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४९ | श्री. काळोखे अशोक लक्ष्मण, रा. शास्त्रीनगर केडगाव यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना आलेली सन २००३ ते २०१० अखेर पाणीपट्टी रूपये ९,०००/- बील क्रमांक १०५चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस व सदरच्या नोंदी डिमांड रजिस्टर, संगणक इत्यादी ठिकाणी घेणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली कामी सन २०११-२०१२ या वर्षाकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १]विषय क्र. ४७- मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ५ शुक्रवार दिनांक २३/९/२०११ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक ६ शुक्रवार दिनांक ३०/९/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ४८ ते ५० च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ४७ शनिवार दिनांक १५/१०/२०११

ठराव क्रमांक- ४७ शनिवार दिनांक १५/१०/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ शुक्रवार दिनांक २३/९/२०११ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ६ शुक्रवार दिनांक ३०/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर:-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ शुक्रवार दिनांक २३/९/२०११ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ६ शुक्रवार दिनांक ३०/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २३/९/२०११ व दिनांक ३०/९/२०११ रोजीचे सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- मागील सभेचे विषय वाचून दाखवावे.

त्याप्रमाणे मागील सभा दिनांक २३/९/२०११ व दिनांक ३०/९/२०११ रोजीचे सभेचे विषय सभेत वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्री. लोंढे सु. सो. :- मागील सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री सातपुते दि. ना. :- मागील सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मागील स्थायी समिती सभा दिनांक २३/९/२०११ व दिनांक ३०/९/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५ शुक्रवार दिनांक २३/९/२०११ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ६ शुक्रवार दिनांक ३०/९/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ> सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती ,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ४८ शनिवार दिनांक १५/१०/२०११

ठराव क्रमांक- ४८ शनिवार दिनांक १५/१०/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. शेख आसीफ इस्माईल, रा. अभिलाषा कॉलनी मुकुंदनगर वॉर्ड क्र.८८ यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकून आकारलेली सन २००५ ते २०१२ अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/-बील क्रमांक ३७३ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.३ (झेंडीगेट) दि.२/७/२०११

**विषय-** नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

**संदर्भ :-** श्री. शेख आसीफ इस्माईल यांचा दि.२/२/०९ रोजीचा अर्ज.

**सादर,**

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. शेख आसीफ इस्माईल यांनी इकडेस अर्ज देउन विनंती केली की, माझे घर अभिलाषा कॉलनी भागात असुन घरपट्टी बीलामध्ये पाणीपट्टीची आकारणी केली आहे. परंतु आमच्या मिळकतीमध्ये नळ कनेक्शन नसल्याने सदरची पाणीपट्टी रद्द करावी अशी विनंती केली आहे.

वास्तवीक परिस्थिती अशी की, वॉर्ड क्र.८८ बील क्र.३७३ वर श्री शेख आसीफ इस्माईल यांची मिळकत आहे. त्यावर सन २००५ ते २०१२ अखेर घरपट्टी रू.——/- व पाणीपट्टी रू.१०,५००/- अशी नोटीस फिसह दोन्ही मिळुन रू. ——————/- इतकी थकबाकी आहे अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी नळकनेक्शन आहे किंवा नाही ? या बाबतचा अहवाल या प्रभागाकडील पाणीपुरवठा फिटर श्री. पाचारणे यांना अहवाल सादर करणे बाबत कळविले असता त्यांनी श्री. शेख आसीफ इस्माईल यांच्या मिळकतीची दि.१०/३/२०११ रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, अस्तीत्वात नाही या बाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

सदरचा अहवाल श्री. पाचारणे (पाणी पुरवठा फिटर) यांनी सदर ठिकाणी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन आलेले नाही. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८५/१ नुसार सन २००५ ते २०१२ पर्यत रू.१०,५००/- इतकी चुकुन लागलेली पाणीपट्टी रद्द करणे संयुक्तीक वाटते तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस प्रभाग समिती क्र.३ यांचा अहवाल असे.

--**--

प्रभाग समिती लिपिक :- सादर, सदर ठिकाणी नळ कने. नाही

प्रभाग अधिकारी :- सादर, रिपोर्टास सहमत मुं. प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम १५२ अनुसार निर्लेखित करणे बाबत कार्यवाहीस्तव.

ऑडीट लिपिक :- प्रस्तावीत "अ" प्रमाणे पाणीपट्टी रद्द करणे करिता मान्यतेसाठी सादर.

मा. मुख्य लेखा परिक्षक :- "अ" यथाप्रस्तावीत

मा.उपायुक्त (कर) :- नियमानुसार पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबत प्रस्तावीतनुसार मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस मान्यतेस्तव व आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब :- पाण्याचा स्त्रोत काय ?

मा.उपायुक्त (कर) साहेब :- फेरसादर, संबंधीत वसुली क्लार्क व वॉर्ड ऑफिसर यांचे स्थळ पाहणी अहवालानुसार अर्जदार हे शेजारच्या घरातून व हातपंपावरून पाणी घेत आहेत माहितीसाठी व पुढील आदेशास्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- कृ. चर्चा , चर्चा केली मान्य दि. १२/९/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मुकुंदनगर येथील श्री. शेख असीफ इस्माईल यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना चुकून आकारलेली पाणीपट्टी रूपये १०,५००/- बील क्रमांक ३७३ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-** श्री. शेख आसीफ इस्माईल, रा. अभिलाषा कॉलनी मुकुंदनगर वॉर्ड क्र.८८ यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकून आकारलेली सन २००५ ते २०१२ अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/-(रूपये दहा हजार पाचशे फक्त)बील क्रमांक ३७३ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री.डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ४९ शनिवार दिनांक १५/१०/२०११

ठराव क्रमांक- ४९ शनिवार दिनांक १५/१०/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. काळोखे अशोक लक्ष्मण , रा. शास्त्रीनगर केडगाव यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना आलेली सन २००३ ते २०१० अखेर पाणीपट्टी रूपये ९,०००/-बील क्रमांक १०५ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस व सदरच्या नोंदी डिमांड रजिस्टर, संगणक इत्यादी ठिकाणी घेणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अ.नगर मनपा केडगांव उपविभाग जा.क्र.३५४ दि.१९/९/२०११

मा.सादर,

विनंती पूर्वक टिप्पणी सादर करण्यांत येते की, श्री. काळोखे अशोक लक्ष्मण , रा. शास्त्रीनगर केडगाव वॉर्ड क्र.३४ बिल नं.१०५ अ.नगर ही मिळकतीवर नळ कनेक्शन नसतांना सन २००३-२०११ अखेर रू.९,०००/- (नउ हजार मात्र) रद्द करण्याबाबत (निर्लेखित ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार मंजुरीसाठी सविस्तर ऑफिस रिपोर्ट ठेवून ठेवले असता सदरचे अधिकार मा.स्थायी समितीस असल्या कारणाने मा.आयुक्त साहेब यांनी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवणे बाबत मंजुरी दिलेली आहे.

तरी श्री. काळोखे अशोक लक्ष्मण वॉर्ड क्र.३४ बिल नं.१०५ केडगांव ,अ.नगर यंच्या सदर मिळकती वरील सन २००३-२०११ अखेर संपूर्ण पाणीपट्टी रक्कम रूपये ९०००/-निर्लेखित (रद्द) करण्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीची मंजुरी मिळावी ही विनंती.

येणेप्रमाणे मुख्य लिपिक केडगाव उपकार्यालय यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- केडगांव ,शास्त्रीनगर येथील श्री. काळोखे यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना आकारलेल्या पाणीपट्टी रू.९,०००/- चे बील निर्लेखित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबतचे अर्ज कधी आलेले आहेत.

स्थायी समिती क्लार्क :- श्री. काळोखे अशोक लक्ष्मण यांनी दिनांक १६/७/२०११ रोजी व श्री.शेख आसीफ इस्माईल यांनी दिनांक २/२/२००९ रोजी अर्ज केलेला आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :- दिनांक २/२/२००९ व दि१६/७/२०१० चे हे अर्ज आहेत पाणीपट्टी निर्लेखित करावयाची सर्वच प्रकरणे एकाच वेळी मंजूरीसाठी सभे पुढे यावीत.

मा.श्री.डागवाले कि.आ. :- नविन बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींवर कर आकरणी करणेच पहावे नळ कनेक्शन नाही म्हणून बील रद्द करणेचेच विषय इकडेस येतात.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम साहेब :- पूर्वीचा सर्वे चुकीचा झाला आहे असे कर्मचा-यांचे म्हणणे आहे टाचण रजिस्टरला नोंद आहे. म्हणून पाणीपट्टी घरपट्टी ची आकरणी केली जाते. पूर्वी प्रत्यक्ष जागा पहाणी होत नव्हती पाणीपट्टी चुकीची का लावली याचा विचार व्हावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मग हि पाणीपट्टी कशी लावली

प्रभाग अधिकारी श्री. के.सी.वर्मा :- पूर्वीचा सर्वे झाले नंतर त्यांच्या नोंदी कॉम्प्युटरला घेतल्या गेल्या त्यानुसार बीले दिली गेली पूर्वी मुकुंदनगर भागात बीले वाटप झाली नव्हती आता बीले गेल्या नंतर त्यांनी अर्ज केलेले आहेत.

मा.श्री. भोसले ग.पुं. व मा.श्री. सप्रे द.ना. :- चुकीची आकारणी करणारे कर्मचा-यांवर कार्यवाही करावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- या प्रकरणामध्ये जागा पहाणी करून प्रस्ताव सादर केला आहे ना ?

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- नळ कनेक्शन पहाणे कामी सर्व स्टाफ घेवुन जावा लागतो त्यात वेळ जातो. प्रत्यक्ष जागेवर पहाणी केली असता वेगळेच आढळते या प्रकरणाची जागा पाहून प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-** श्री.काळोखे अशोक लक्ष्मण, रा. शास्त्रीनगर केडगाव यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना आलेली सन२००३ते २०१०अखेर पाणीपट्टी रूपये९,०००/- (रूपये नउ हजार फक्त ) बील क्रमांक १०५ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस व सदरच्या नोंदी डिमांड रजिस्टर, संगणक इत्यादी ठिकाणी घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री.डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती ,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०७**

विषय क्रमांक- ५० शनिवार दिनांक १५/१०/२०११

ठराव क्रमांक- ५० शनिवार दिनांक १५/१०/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली कामी सन २०११-२०१२ या वर्षाकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर:-**अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर जकात विभाग-७३ दि.०७/१०/२०११

विषय- सन २०११-२०१२ या वर्षाकरीता जकात व पारगमन शुल्क संकलन करीता जकात अभिकर्ता नेमणुक बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेने सन २०११-२०१२ या वर्षाकरीता जकात व पारगमन शुल्क संकलन करीता जकात अभिकर्ता नेमणूक बाबत प्रसिध्दीस दिलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार दि.०७/१०/२०११ रोजी सकाळी ११.०० वा. मा.उपायुक्त यांचे दालनात जकात व पारगमन शुल्क चे ठेक्याकरीता प्राप्त निविदा उघडल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा फॉर्म फी | लिफाफा क्र.१ बयाणा रक्कम | लिफाफा क्र.२ तांत्रिक | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | डी.डी.क्र./ दिनांक | डी.डी.क्र./ दिनांक | १ वर्षाचा जकात व टोल वसुलीचा अनुभव | ३ वर्षाचे लेखा विवरणपत्र | पॅन कार्ड झेरॉक्स |
| १ | विपूल ऑक्ट्रॉय सेंटर | १८२९८३ दि.१६/०९/११ | ७०००४९ दि.१९/९/११ | जॉईंट व्हेंचर ०७-०८ | नाही २ वर्षाचे रिटर्न आहे. | आहे. |
| २ | विक्रमादित्य सिक्युरिटी सर्व्हीसेस | ६४९१४२ दि.२०/०९/११ | ११४१४१ ११४१४२ दि.२१/९/११ | कार्यादेश ०६-०७ | २ वर्षाचे | आहे |
| ३ | सोलापूर कंन्स्ट्रक्शन अँण्ड फॅब्रिकेशन प्रा.लि. | ००२३९६ दि.२०/०९/११ | ६४९१७५ दि.२१/९/११ | आहे | १ वर्षाचे १०-११ | आहे |
| ४ | ओंकारा कंन्स्ट्रक्शन | ०८५८५२ दि.१६/९/११ | ८०१७३४ दि.३/१०/११ | आहे | नाही १ वर्षाचे २०११ आहे | आहे |
| ५ | सहकार ग्लोबल प्रा.लि. | ६६२३९४ दि.१६/९/११ | ६६२३९३ दि.१६/९/११ | आहे | २ वर्षाचे ०९-१० १०-११ | आहे |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदाधारकांचे लिफाफा क्रमांक १ व लिफाफा क्र.२ उघडला असता त्यामध्ये अ.नं. २ विक्रमादित्य सिक्युरिटी सर्व्हिसेस यांचे अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले नसल्याने त्यांना सदर निविदा प्रक्रियेतुन अप्रात्र ठरविण्यात आले तसेच उर्वरित निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा क्रमांक ३ उघडण्यात आले असुन सदर लिफाफ्यामध्ये खालील प्रमाणे देकार रक्कमा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | लिफाफा क्र.३ व्यापारी लिफाफा देकार रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|
| १ | विपूल ऑक्ट्रॉय सेंटर | ८१.९९ कोटी | |
| २ | विक्रमादित्य सिक्युरिटी सर्व्हीसेस | ------- | अनुभवाचे प्रमाणपत्र दिलेले नसल्याने अपात्र |
| ३ | सोलापूर कंन्स्ट्रक्शन अँण्ड फॅब्रिकेशन प्रा.लि. | ९०.११ कोटी | |
| ४ | ओंकारा कंन्स्ट्रक्शन | ७४.५१ कोटी | |
| ५ | सहकार ग्लोबल प्रा.लि. | ६४.०८ कोटी | |

वरीलप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कम रू.६०,९६,१५,०००/- यापेक्षा मे. सोलापूर कंन्स्ट्रक्शन & फॅब्रीकेशन प्रा.लि. यांची रक्कम रू.९०.११ कोटी इतक्या देकार रक्कमेची निविदा ही सर्वात जास्त देकार रक्कमेची प्राप्त झालेली आहे.

तरी वरीलप्रमाणे सन २०११-१२ करीता जकात व पारगमन शुल्क वसुलीस्तव निविदा प्रक्रियेमध्ये मे. सोलापूर कन्स्ट्रक्शन & फॅब्रीकेशन प्रा.लि. यांची निविदा मंजुर करून त्यांची जकात अभिकर्ता नेमणुक करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची २ प्रकरण ८ मधील कलम ३५ नुसार मा. स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर करण्यास पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर./**अ**

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे. दि.७/१०/२०११

--**--

मा.मुख्य लेख परिक्षक :- प्रस्तावाप्रमाणे मे. सोलापूर कन्स्ट्र. ॲण्ड फॅब्रीकेशन प्रा.लि. यांची महत्तम दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर मान्यतेकरिता निर्णयास्तव ठेवणेस मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे निर्णयास्तव / मंजुरीस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. दि.७/१०/२०११

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ पाठवा. दिनांक ७/१०/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

**मा.सभापती साहेब :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्टानुसार निर्णयासाठी प्रस्ताव आहे.

**मा.श्री. लोंढे सु.सो. :-** ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

**मा.श्री. लोंढे सु.सो. :-** आपण मंजूरी दिले नंतर सदर ठेकेदार आपले कडेस अनामत वैगरेची पुर्तता तो कधी करणार.

**मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :-** सभेचा ठराव प्राप्त झाले नंतर बॅन्क गॅरंटी, करारनामा इत्यादी बाबत पुढिल कार्यवाही करणेत येईल.

**मा.श्री. सप्रे द. ना. :-** आपण मंजूरी देणार आहोत.

**मा.श्री. लोंढे सु.सो. :-** आपण मंजूर केले नंतर सदर ठेकेदार ठेका घेणेस आपले कडे आला नाही तर आपण काय करणार

**मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :-** आपण सदर अभिकर्ता संस्थेस बॅंक गॅरंटी देण्याबाबतचे पत्र दिले नंतर तो आपले कडेस आला नाही तर लवकरात लवकर मिटींग घेउन पुढिल कार्यवाही करणेत येईल.

**मा.श्री.भोसले ग.पुं.:-** मंजूर अभिकर्ता यांनी जकात ठेका घेतला नाही तर सेकंड लोएस्ट अभिकर्त्यास ठेका देता येईल का ?

**मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :-** प्रशासनाने सादर केले प्रमाणे प्रस्तावास मंजूरी मिळावी.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** जकातीच्या अटी शर्ती वाचून दाखवाव्या.

**जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :-** जकात व पारगमन शुल्क वसुली कामी मा. शासनाचे दिनांक १९ एप्रिल २०११ चे मार्गदर्शक परिपत्रकामधील अटी शर्ती वाचून दाखवितो.

त्याप्रमाणे अटी शर्ती सभेत वाचून दाखविण्यांत आल्या.

**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** जकात वसुली पावती पुस्तके आपण अभिकर्ता संस्थेस देतो. त्यानुसार प्रत्यक्ष उत्पन्न किती होते ते सांगावे.

**जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री.सारसर :-**डुप्लीकेट पावत्या आपलेकडेस जमा होतात.परंतु आपण त्याचे रेकॉर्ड तयार करून ठेवत नाही.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** पुढिल सभेत त्याची माहिती देणेत यावी.

**जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री.सारसर :-** जकात अभिकर्ता यांच्या गोडावूनला आग लागल्यामुळे आगीमध्ये त्यांचे रेकॉर्ड जळाले असल्याने माहिती देता येणार नाही.

**मा.श्री. डागवाले कि.आ. :-** पारगमन शुल्क वसुलीची पुस्तके आपण त्यांना देतो त्या वरून वसुलीचा अंदाज येईल त्याप्रमाणे आकडेवारी काढणेत यावी.

**मा.उपायुक्त (सा.) श्री. डोईफोडे साहेब :-** एस्क्रो अकौंट ठेवले नंतर वसुली बाबत माहिती मिळेल.
**मा.श्री. भोसले ग.पुं. :-** सध्याचे ठेकेदार यांनी आपले कडेस मागील रेकॉर्ड जमा केले असेल ना ?
**जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री.सारसर :-**मागील वर्षीचे जमा केलेले आहेत नंतर जमा केले नाही.
**मा.श्री.भोसले ग.पुं. व मा.श्री. डागवाले कि.आ. :-** आपण दिलेल्या पावती पुस्तकाप्रमाणे पारगमन शुल्क वसुलीची माहिती काढून ती पुढिल सभेमध्ये देण्यांत यावी.
**मा.सभापती साहेब :-** मा.सदस्यांना पुढिल सभेत माहिती द्यावी.
**मा.श्री.भोसले ग.पुं. :-** अटी शर्ती नुसार महानगरपालिकेचे कर्मचारी नाक्यावर नेमतांना पर्यवेक्षकिय दर्जाचा कर्मचारी नेमणेत यावा. बिगारी वैगरे नेमु नये
**मा.श्री. सातपुते दि. ना. :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
**मा.श्री. कावरे द. ह.:-** ऑफिस रिपोर्ट मंजूर करणेत यावा.
**मा.सभापती साहेब :-** ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात व पारगमन शुल्क वसुली कामी सन२०११-२०१२या वर्षाकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कमे पेक्षा तुलनात्मक दृष्टया जास्तीचे निविदा धारक मे.सोलापूर कंन्स्ट्रक्शन ॲण्ड फॅब्रीकेशन प्रा.लि. यांची रूपये ९०.११कोटी (रूपये नव्वद कोटी आकरा लाख फक्त)इतक्या देकार रक्कमेची निविदा ही सर्वात जास्त असल्याने मंजूर करण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका